# अॅग्रोमेट अॅडवायझरी बुलेटीन

## ग्रामीण कृ ष मौसम सेवा, ऐएमएफयु,

## कृषी हवामानशास्त्र वभाग

फोन : ०२०-२५५३८००९ कृषी महा वद्यालय, पुणे ४११ ००५ ई-मेल : amfupune@gmail.com

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला स मतीची साप्ताहिक बैठक दि. ११/०३/२०२५

### जिल्हा :पुणे

**मागील आठवडयाचे हवामान :**

मागील आठवडयाचे हवामान : पुणे परिसरात मागील आठवडयात कमाल तापमान ३६.० ते ३८.० अंश सेल्सिअस तर कमान तापमान १३.३ ते १७.६ अंश सेल्सिअसच्या दरम्यान होते. सकाळची सापेक्ष आर्द्रता ७० ते ७५ टक्के तर दुपारची सापेक्ष आर्द्रता १० ते २३ टक्के होती. वाऱ्याचा सरासरी वेग ताशी २.२ ते ३.७ क.मी. होता.

हवामान अंदाज : पुढील पाच दिवसात पुणे जिल्ह्यात कमाल तापमान ३७ ते ३९ अंश सेल्सिअस, तर कमान तापमान १६ ते १९ अंश सेल्सिअसच्या दरम्यान राहील. सकाळची सापेक्ष आर्द्रता ४७ ते ४९ टक्के तर दुपारची सापेक्ष आर्द्रता ३१ ते ३३ टक्के दरम्यान राहील. वाऱ्याचा सरासरी वेग ताशी ०१ ते ०७ क.मी. दरम्यान राहील. आकाश निरभ्र ते अंशतः ढगाळ राहील. वा-याची दिशा नैऋत्तेकडून ईशान्येकडे राहील.

| मागील आठवड्यातील हवामान (०१/०३/२०२५ ते ०७/०३/२०२५) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (११/०३/२०२५ ते १५/०३/२०२५) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **5** | **6** | **7** | **8** | **9** | **10** | **11** | दिनांक | 12 | 13 | 14 | 15 | 16 |
| 0.0 | 0.0 | 0.0 | 0.0 | 0.0 | 0.0 | 0.0 | पाऊस ( ममी) | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 36.8 | 36.0 | 36.7 | 36.4 | 38.0 | 37.4 | 36.9 | कमाल तापमान(अं.से.) | 38 | 39 | 39 | 38 | 37 |
| 16.9 | 13.4 | 13.3 | 14.3 | 14.6 | 16.5 | 17.6 | कमान तापमान(अं.से.) | 18 | 17 | 16 | 17 | 19 |
| | | | | | | | ढग स्थिती (आकाश) | 0 | 1 | 1 | 3 | 4 |
| 72 | 75 | 71 | 70 | 75 | 72 | 73 | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | 47 | 48 | 48 | 49 | 48 |
| 23 | 11 | 10 | 12 | 14 | 16 | | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | 33 | 32 | 31 | 32 | 33 |
| 2.6 | 3.1 | 2.2 | 2.5 | 2.7 | 2.7 | 3.7 | वाऱ्याचा वेग ( कमी/तास) | 6 | 1 | 6 | 5 | 7 |
| | | | | | | | वाऱ्याची दिशा (अंश) | 121 | 135 | 288 | 306 | 319 |

## हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | पीक अवस्था | कृ ष वषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश/ इशारा | | भारतीय हवामान खात्याच्या प्रादे शक हवामान केंद्र, मुंबई यांच्या अंदाजानुसार जिल्ह्यात दिनांक ११ ते १५ मार्च, २०२५ दरम्यान हवामान कोरडे राहण्याची शक्यता आहे. |
| वस्तारित श्रेणी अंदाज (ईआरएफएस) | | वस्तारित श्रेणी अंदाजानुसार (ईआरएफएस) मध्य महाराष्ट्र वभागात (धुळे, नंदुरबार, जळगाव, ना शक, अहमदनगर, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर) दिनांक ०५ ते ११ मार्च, २०२५ दरम्यान<br>➢ पावसाचे प्रमाण सरासरी पेक्षा कमी राहण्याची शक्यता आहे.<br>➢ कमाल तापमान सरासरी इतके राहण्याची शक्यता आहे.<br>➢ कमान तापमान सरासरी इतके राहण्याची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | • कोरडे हवामान राहण्याची शक्यता लक्षात घेता उन्हाळी पके, भाजीपाला व फळबागांना स्थानिक परिस्थिती, ज मनीची खोली/ ज मनीचा प्रकार व गरजेनुसार पाणी द्यावे. |

| | | |
|---|---|---|
| | | • फळबागेमध्ये ज मतीत ओलावा टिकवून ठेवण्यासाठी आच्छादनांचा वापर करावा.<br>• शेतकरी बांधवांनी आपल्या पकाचे कीड व रोगासंदर्भात निय मत सर्वेक्षण करून जर प्रादुर्भाव आ र्थक नुकसान पातळीच्या वर असल्यास व वध योग्य त्या उपाययोजना कराव्यात.<br>• शेतकरी बंधूनी हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला व हवामानचा पूर्वानुमाना करीता मेघदुत मोबाईल ॲपचा वापर करावा.<br>• शेतकरी बंधूनी मेघगर्जना व वजेचा पूर्वानुमाना करीता दा मनी मोबाईल ॲपचा वापर करावा.<br>• शेतकरी बंधूनी कृ ष वषयक माहितीसाठी, महात्मा फुले कृ ष वद्यापीठाच्या कृ षद र्शनीचा एक संदर्भ ग्रंथ म्हणून उपयोग करावा. |
| हरभरा | काढणी ते साठवणूक अवस्था | हरभरा पीक ओलसर असताना काढणी करु नये. घाटे कडक वाळल्यानंतर मगच हरभऱ्याची काढणी करून मळणी करावी. यानंतर धान्यास ५-६ दिवस कडक ऊन द्यावे. हरभरा कोठीमध्ये साठवून ठेवावा. त्यामध्ये कडु लंबाचा पाला घालावा. त्यामुळे साठवणीत कीड लागत नाही. |
| उन्हाळी भुईमूग | पक वाढीची अवस्था | उन्हाळी भुईमूग पकास ज मनीच्या मगदूराप्रमाणे व उपलब्धतेनुसार ८ ते १० दिवसांच्या अंतराने पाणी द्यावे. पकाची कोळपणी व खुरपणी करुन पक तण वरहीत ठेवावे जेणेकरून तणांची अनद्रव्यांसाठीची स्पर्धा रोखण्यास मदत होईल. |
| ऊस | पक वाढीची अवस्था | ऊस पकातील खोड कडीच्या जै वक नियंत्रणासाठी ट्रायकोग्रामा चलोनिस (ट्रायकोकार्ड) प्रती एकर चार तसेच कामगंध सापळे (इ.एस.बी.ल्यूर) ५ प्रती हेक्टरी वापरावेत. प्रादुर्भावग्रस्त झालेली रोपे ज मनीलगत कापावीत आ ण नष्ट करावीत. |
| रब्बी ज्वारी | काढणी ते साठवणूक अवस्था | रब्बी ज्वारीचे पक काढणी अवस्थेत आलेले असल्यास त्याची काढणी व मळणी करावी. तसेच मळणी झालेले धान्य उन्हात चांगले वाळवावेत (धान्यातील ओलावा १० % पेक्षा कमी असावा) आ ण त्यामध्ये वाळलेला कडूनिंबाचा पाला मसळून साठवणूक करावी. साठवण कोंदट कवा ओलसर जागेत करू नये. |
| गहू | काढणी ते साठवणूक अवस्था | पकाची कापणी पक पक्व होण्याच्या २-३ दिवस आधी करावी , त्यामुळे गव्हाचे दाणे शेतात झडण्याचा प्रकार होत नाही. गहू पकाची कापणीच्या वेळी दाण्यातील ओलाव्याचे प्रमाण १५ % असावे. धान्य उन्हात चांगले वाळवावे आ ण साठवण कोंदट कवा ओलसर जागेत करू नये. |
| मका | काढणी ते साठवणूक अवस्था | पक काढणी अवस्थेत आलेले असल्यास त्याची काढणी करावी. तसेच उन्हात चांगले वाळवावेत. साठवण कोंदट कवा ओलसर जागेत करू नये. |
| केळी | पक वाढीची अवस्था | केळी बागेत काकडी, भोपळा, क लंगड, खरबूज तसेच मरची, वांगी यासारखी पके घेणे कटाक्षाने टाळावे. झाडे पडू नयेत म्हणून व वजनाने मोठ्या असलेल्या घडास गरजेप्रमाणे बांबूच्या कंवा पॉलीप्रोपेलीनच्या पट्यांच्या सहयायाने झाडांना/ घडाना आधार/ टेकू द्यावा. |
| आंबा | फळधारण अवस्था | अ धक तापमानामुळे झाडाला पाण्याचा ताण बसून फळगळ होण्याची शक्यता असल्याने पाण्याच्या उपलब्धतेनुसार बागेस पाणी द्यावे. बागेमध्ये ज मनीत ओलावा टिकवून ठेवण्यासाठी आच्छादनांचा वापर करावा. तसेच आंबा पकावरील बुरशीजन्य रोगामुळे फळगळ होऊ नये म्हणून कार्बनडॅन्झीम १ ग्रॅम प्रती लटर पाण्यात मसळून फवारणी करावी. |
| जनावरांचे व्यवस्थापन | | महात्मा फुले कृषी वद्यापीठाच्या देशी गाय संशोधन प्र शक्षण केंद्रांतर्गत पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र वभागाच्यावतीने वक सत करण्यात आलेल्या देशातल्या पहिल्या फुले अमृतकाळा ( **Phule Amrutkal App**) या पशुसल्ला मोबाईल प्रणालीचे (ॲप) लोकार्पण झाले असून , आता आपण ते मोबाईल मध्ये इंस्टाल करून मोबाईलवर पशुसल्ला घेऊ शकतो.<br>फुले अमृतकाळ ॲप डाउनलोड ( **Phule Amrutkal App Download**) केल्याने होणारे फायदे :<br>फुले अमृतकाळ या ॲपचाद्वारे जनावरांना उष्णतेमुळे निर्माण होणारा ताण कमी करण्यासाठी , गोठ्यातील तापमान घट वण्याकरिता व योग्य आर्द्रता राखण्याकरिता सावलीची सोय करणे , योग्य वायु वजन राखणे , पण्याकरिता थंड पाणी उपलब्ध करून देणे , फॅन कंवा फॉगर यंत्रणा |

| | | |
|---|---|---|
| | | स्वयंच लत पद्धतीने सुरू करणे तसेच संतु लत आहार नियोजन इत्यादी उपाय योजना करण्यासाठी वेळोवेळी सूचना दिल्या जातील. |

*टिप : शेतकरीबंधूनी पकावर कटकनाशकाची, बुरशीनाशकाची फवारणी करताना स्वत:ची योग्यती खबरदारी/ काळजी घ्यावी तसेच फवारणी करिता कसान कवच बॉडीसूटचा वापर करावा.

स्त्रोत :

१) हवामान पूर्वानुमान : प्रादे शक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.

२) मागील हवामान : -

ठिकाण : कृ.म. व., पुणे.

दि. : ११.०३.२०२५

स्वाक्षरीत

प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, पुणे तथा

प्रमुख, कृ ष हवामानशास्त्र वभाग, कृ.म. व., पुणे